# आमच्या बद्दल थोडंसं...

**युथ फॉर जत** हि एक सेवाभावी संस्था आहे जी काही उच्चशिक्षित तरुणानांनी एकत्र येऊन सुरु केली आहे. शिक्षण या मूलभूत विषया मध्ये हि संस्था काम करते कारण आमचा विश्वास आहे कि "जग बदलण्या साठी शिक्षण हे एक सर्वात धारधार शस्त्र आहे".

सध्या आम्ही हि संस्था स्वतःचे आणि काही दानशूर परिचितांचे पैसे एकत्र करून चालवतो. बाकीच्या सेवाभावी संस्था प्रमाणे आम्ही हि तुमच्या देणगी वर अवलंबून आहोत. आम्ही खात्री देऊ इच्चीतो कि तुमची देणगी शाळकरी मुलांच्या सत्कर्मी कार्याला खर्ची घातली जाईल जे देशाचे भविष्य आहेत.

देणगी देण्यासाठी कृपया खालील बँक खात्याचा उपयोग करा. आम्हाला खात्री आहे कि तुम्ही जरूर आम्हाला प्रतिसाद द्याल. तुम्हाला काही प्रश्न असतील तर ते आम्हाला कळवा. आम्ही त्यांचे निरसन करण्याचे निश्चित प्रयत्न करू.

## बँक खाते

युथ फॉर जत
खाता संख्या - ३५९५७०८९९९२ (चालू खाते)
आय एफ एस सी कोड - SBIN000५८५२
स्टेट बँक ऑफ इंडिया
जत, जिल्हा - सांगली (महा.)

## संपर्क


ईश्वर गौरी बिल्डिंग, मोरे कॉलनी
जत, जिल्हा - सांगली
पिन कोड ४१६ ४०४ (महा.)

दूरध्वनी: +९१ ९७६६६६३९४०
इ-मेल: youth4jath@gmail.com
वेबसाईट: www.youth4jath.org
फेसबुक: www.facebook.com/youth4jath
ट्विटर: @youth4jath


प्रिंट - ०२/२०१८ / प्रत १.०

# आमचे कार्यक्रम आणि उपक्रम (२०१६ - २०१८)



युथ फॉर जत

**बहू-उद्देशीय सामाजिक संस्था**

सेवाभावी संस्था नोंदणी क्रमांक - फ -१७८२७
स्थापना जुलै २०१६

# आमचे कार्यक्रम

## शाळेतील वर्गासाठी बोर्ड (फेब्रुवारी २०१८)

*सुमारे ५० हजार रुपयांचे १० बोर्ड शाळेला भेट*



दिनांक १० फेब २०१८ रोजी युथ फॉर जत या संस्थेने १० मोठ्या आकाराचे हिरव्या पृष्ठभागाचे बोर्ड तसेच २ नोटीस बोर्ड एस आर व्ही एम हायस्कूल व जुनिअर कॉलेज या शाळेला माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्या वेळी भेट दिले. या नवीन संचा मुळे शाळेच्या ५०० ते ६०० मुलांना थेट मदत होईल.

## एम पी एस सी/ यु पी एस सी मार्गदर्शन कार्यशाळा (डिसेंबर २०१७)

*सुमारे ४०० मुला- मुलींना आय ए एस अधिकाऱ्याकडून मार्गदर्शन*





दिनांक २५ डिसेंबर २०१७ रोजी युथ फॉर जत या संस्थेने "एम पी एस सी/ यु पी एस सी मार्गदर्शन" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते श्री. अभिजित राऊत, सीईओ जिल्हा परिषद सांगली, श्री पांडुरंग पोळे सीईओ झोपडवस्ती निर्मूलन, पुणे हे होते. अशा प्रकारचा जत च्या इतिहासा मधला पहिला उपक्रम होता ज्या मध्ये एकाच वेळी २ आय ए एस अधिकाऱ्यांनी एकत्र मार्गदर्शन केले.

# भविष्यातले उपक्रम

## फिरते वाचनालय

*नावीन्य पूर्ण प्रकल्पा साठी सुमारे १० लाख रुपये उभे करण्याचा प्रयत्न*



फिरते वाचनालय हि एक नावीन्य पूर्ण योजना आहे ज्यावर आम्ही काम करत आहोत. या योजने द्वारे लहान मुले व तरुण यांच्या मध्ये नवीन ज्ञाना चा प्रसार व्हावा हा उद्देश आहे. हे वाचनालय विविध शाळा कॉलेज व जत भागात मध्ये वेग वेगळ्या ठिकाणी वेळा पत्रक प्रमाणे फिरेल. मुलांना वेग वेगळ्या विषय वरच्या पुस्तकांचा या वाचनालय मधून आनंद घेता येईल जेणे करून त्याच्या ज्ञानात आणि शब्द कोश मध्ये भर पडेल.

## डिजिटल (दृक -श्राव्य) शाळा

*२०१८ मध्ये कमीत कमी २ शाळा डिजिटल करण्याचा संस्थेचा प्रयत्न*



ग्रामीण आणि शहरी भागातल्या मुलांच्या शिक्षण मध्ये बरीच तफावत असते. जग माहिती आणि तंत्रज्ञान च्या माध्यम द्वारे जवळ येत आहे परंतु त्याचा लाभ ग्रामीण भागातल्या मुलांना अजून मिळत नाही. आम्ही शाळा, शिक्षक आणि गावकरी यांच्या बरोबर काम करून जत भागा मध्ये डिजिटल शाळा निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे.

# इतर उपक्रम

### *विकास आणि रोजगाराची निर्मिती साठी रेल्वे मार्ग प्रस्ताव*




जलद संवाद आणि सहज प्रवास अर्थव्यवस्थेचे महत्वाचे सूत्र आहे. एकंदरच दळणवळणाच्या बाबतीत जत दुर्लक्षित भाग आहे. नवीन रेल्वे चा प्रस्ताव घेऊन युथ फॉर जत संबंधित अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे.

# आपले खुप आभार !!!

## फिरत्या वाचनालयासाठी पुस्तके (नोव्हे २०१७)

### *संस्थेला ४००० रुपयांची १० पुस्तकांची देणगी*



श्री. ओमकार कुडाळकर, आर. आर. कॉलेजचे आधी-व्याख्याता यांना फिरत्या वाचनालयाची संकल्पना पसंत पडली. त्यांनी संस्थेला सुमारे ४००० रुपयांची १० पुस्तके देणगी स्वरूपात दिली आहेत. आमचे त्यांना शतशः आभार.

## इंग्लंड हुन कपडे (ऑगस्ट २०१७)

### *निवासी मूक बधीर शाळे मध्ये १०० शर्ट जोड्यांचे वाटप*



युथ फॉर जत ने निवासी मूक बधीर शाळा आणि निवासी मती मंद शाळेच्या विद्यार्थ्यांना (मानसिकदृष्ट्या विकलांग शाळा) नवीन आणि वापरलेले कपडे वितरित केले. हे कपडे संस्थेचे वरिष्ठ सदस्य श्री अजय पवार यांनी इंग्लंड हुन आणले होते.

## शाळेच्या दप्तराचे वाटप (ऑगस्ट २०१७)

### *सुमारे १०,००० रुपये किमतीच्या ६० दफ्तारांचे वाटप*



५ ऑगस्ट २०१७ रोजी 'युथ फॉर जत' ने तुराई वस्ती, जत येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वितरित केले.

## वह्यांचे वितरण (जुलै २०१७)

### *सुमारे १५,००० रुपये किमतीच्या १२०० वह्यांचे वाटप*



युथ फॉर जत चे वैद्यकीय सल्लागार डॉ. सुनील जोशी यांनी सुमारे २०० गरीब विद्यार्थ्यांना या वह्या जत मधील प्राथमिक शाळे मध्ये वाटल्या.

## प्रोजेक्टर देणगी (फेब्रु २०१७)

*रु १०,००० किमतीचा प्रोजेक्टर मूक- बधिर शाळेला दान*



युथ फॉर जतचे सदस्य श्री. प्रदीप साळुंखे आणि श्री अमीत बामणे यांनी वाढ दिवस निमित्त जतमधील मूक- बधिर मुलांच्या शाळेला प्रोजेक्टर दान केला. शाळेला या साधनाची बर्याच दिवसापासून गरज होती. नवीन प्रोजेक्टरचा शाळेला आणि विद्यार्थ्यांना बराच उपयोग होत आहे.

## सायबर गुन्हे जागरुकता (डिसें २०१६)

*श्री. सोमनाथ कदम यांचे सायबर गुन्हे विषयावर व्याख्यान*



युथ फॉर जत संस्थेने सायबर गुन्हयाच्या जागरुकतेवर राजे रामराव कॉलेज येथे एक व्याख्यान आयोजित केले होते. सायबर क्राईम शाखेचे श्री. सोमनाथ कदम, पोलीस उप निरीक्षक पालघर यांनी परस्पर संवादी भाषण दिले. श्री कदम यांनी सोशल मीडियावर 'काय करावे आणि काय करु नये' याबद्दल बर्याच नवीन गोष्टी शिकल्या. व्याख्यान ऐकून महाविद्यालयीन विद्यार्थी भारावून गेले.

## आर.आर. कॉलेज जतच्या विद्यार्थ्यांना मदत (डिसें २०१६)

*१३ विद्यार्थ्यांना, प्रत्येकी १००० रुपये वाटप*



सायबर जागरूकता कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्ही काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी मदत केली. गुणवत्ता आणि कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारित गरजू विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाकडून मिळाली होती.

## एस आर व्ही एम हायस्कुलच्या विद्यार्थ्यांना मदत (ऑगस्ट २०१६)

*२० हजार रुपयांची सुमारे २१ विद्यार्थ्यांना मदत*



आमच्या संस्थेचा हा पहिला सामाजिक कार्यक्रम. हा आमच्यासाठी एक विशेष कार्यक्रम होता. सर्व संस्थापक सदस्य, तसेच एस आर व्ही एम हायस्कूलचे माजी विद्यार्थी यानी ७० व्या स्वातंत्र्यदिन सोहळा शाळा कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसह साजरा केला. आमच्या संस्थेच्या सामाजिक कार्याच्या प्रवासाला सुरूवात करण्यासाठी ह्यापेक्षा जणू उत्तम कार्यक्रमाच न्हवता !